## दि.०२.०७.२०२० रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत.

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा.आयुक्त यांचे कक्षामध्ये दि.०२.०७.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. या सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

मा.आयुक्त, अध्यक्ष.
मा.श्री.श्रीचंद तेजवाणी, सदस्य.
मा.श्री.अजय गोंडाणे, सदस्य.
मा.श्री.प्रशांत डवरे, सदस्य.
मा.सौ.प्रमिला जाधव, सदस्या.
मा.सौ.वंदना मडघे, सदस्या.
मा.श्री.मधुकर घारड, तांत्रिक सदस्य.
मा.उप-आयुक्त(प्रशा.)
मा.पर्यावरण अधिकारी.
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.१
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.२
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.३
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.४
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.५
मा.स.स.न.र.अधिकारी.
मा.उपअभियंता अभियंता, सा.बां.वि.
मा.उप-अभियंता, विद्युत विभाग.
मा.उद्यान अधिक्षक. म.न.पा.

मा.उद्यान अधिक्षक, मनपा, यांनी मा.सभापती वृक्ष प्राधिकरण समिती यांचे परवानगीने सभेची सुरुवात करण्यात आली.

विषय पत्रिकेतील,

**विषय क्र.१ :-** दि.१७.०२.२०२० रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचे कार्यवृत्तांत समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आले. कार्यवृत्तांताचे सर्व सदस्यांनी अवलोकन केले व अवलोकना दरम्यान पेज क्र.५ वरील अर्ज क्र.१० चे ठराव क्र.१० मध्ये दंड किती करायचा नमुद नाही. प्रत्येक वृक्षामागे धोरणाप्रमाणे दंड घ्यावा. पेज क्र.५ वरील अर्ज क्र.११ चे ठराव क्र.११ मध्ये दंड आकारल्यावर नियमाप्रमाणे व धोरणानुसार झोन ने खात्री करावी. याप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.

**विषय क्र.२ :-** दि.१७.०२.२०२० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांत निर्णयाप्रमाणे कार्यपुर्ती अहवाल समिती समोर वाचून दाखविण्यात आला. समितीने कार्यवृत्तांताच्या कार्यपूर्ती अहवालाचे अवलोकन केले.

**विषय क्र.३ :-** झोन क्र.१ ते ५ चे वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त अर्जाबाबत त्यांनी सादर केलेल्या अहवालावर चर्चा करुन निर्णय घेणे. अहवाल सादर करण्यात आले.



Scanned with CamScanner

उत्तर झोन क्र.१

**अर्ज क्र. १ :-** श्री.विजय ना.बोंडे, सौ.पुष्पाताई बोंडे, रहाटगाव अमरावती. २ आंबा, १ निंब वाळलेले वृक्ष / फांद्या काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदाराचे प्राप्त अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळी वृक्ष पाहणी केली असता आंबा वृक्ष ०२ व निम वृक्ष ०१ वाळलेले असून पडलेले होते, असे एकुण ०३ पडलेल्या वृक्षांची विल्हेवाट लावण्याकरीता तसेच एक आंबा वृक्षाची वाळलेली फांदी काढण्याकरीता अर्जदारांना जा.क्र.९१३ अन्वये दि.०५.०३.२०२० रोजी अटी/शर्तीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात आली आहे. प्रकरण कार्योत्तर मंजुरी करीता सादर.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** उपविभागिय अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे व मालमत्ता उपविभाग, अमरावती. १ कडूनिंब वाळलेले वृक्ष / फांद्या काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदाराचे प्राप्त अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळी वृक्ष पाहणी केली असता निम वृक्ष ०१ वाळलेला होता सदर वाळलेला वृक्ष काढण्याकरीता अर्जदारांना अमनपा/उ.प्र./स.आ./०३/२०२० अन्वये दि.०५.०६.२०२० रोजी अटी/शर्तीच्या अधिन राहुन एक वाळलेला निम वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. प्रकरण कार्योत्तर मंजुरी करीता सादर.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.राजेंद्र शंकर कवडे, कपिल वस्तु नगर, अमरावती. २ पिंपळ वृक्ष / फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी करण्यात आली असता अर्जदाराचे राहत्या घरी पिंपळ वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहेत. कोणतीही अडचण नाही. कंपाउंडमध्ये वृक्ष आहे. कंपाऊंड वॉल घेतांना इनर किंवा आऊटर रिंग घेवून वृक्ष ठेवता येतो. करीता नमुद दोन्ही वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच वृक्षाला इजा पोहचणार नाही याबाबत अर्जदाराला आदेशित करावे लागेल. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** श्री.अनिलकुमार हरीराम मसंद, रामपुरी कॅंप, अमरावती. १ कॉटन सिल्क (सावर) वृक्ष / फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी करण्यात आली असता नमुद वृक्ष मनपाने रस्त्याचे कडेला सार्वजनिक जागेवर ट्रीगार्डमध्ये लावलेला आहे. तसेच वृक्ष हिरवागार असून त्याला फळे आलेली आहेत. सबब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी व वृक्षाला इजा पोहचवू नये असे अर्जदाराला कळवावे लागेल. तसेच कॉंक्रीट मध्ये फसला असून वृक्षाचे बुडाजवळ कचरा जाळल्या जाते असे दिसून आले. सबब स्वास्थ निरीक्षक / स्वच्छता कर्मचाऱ्यांना झाडाचे बुडाजवळ कचरा जाळु नये. याबाबत सुचना द्याव्या लागेल. तसेच बुडा जवळील कॉंक्रिट काढण्यास बांधकाम विभागास निर्देशित करावे लागेल. त्याअनषंगाने निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करुन अहवालाप्रमाणे कार्यवाही करुन वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** श्री.अमोल बकारामजी सयाम, रहाटगांव, अमरावती. १ निम वृक्ष / फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.



Scanned with CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदाराचे प्राप्त अर्जानुसार त्यांना नव्याने बांधकाम करायचे असल्याबाबत नमुद आहे त्याअनुषंगाने तांत्रिक मत जाणुन घेण्याकरीता प्रकरण मा.सहा.संचालक नगर रचना मनपा कडे सादर करण्यात आले होते. उपअभियंता यांचे प्राप्त अहवालानुसार वरील झाड MARGICAL SPACE मध्ये असल्याने झाडापासुन Env.Engg. हि बाब तांत्रिक दृष्ट्या पाण्याकरीता महत्वाचे असल्याने झाड तोडता येणार नाही. असे सहा.अभियंता यांचे मत आहे. करीता वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी असे उपअभियंता यांचे मत आहे. त्यानुसार उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** श्री.प्रणय सुरेश घरडे, हर्षराज कॉलनी, अमरावती. ८ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी करण्यात आली असता सागवान वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहे. सदर वृक्षांचे फांद्यांना तारांचा स्पर्श होत असल्याने फांद्या शक्तीमान यंत्राव्दारे काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष उंच असल्याने चढुन फांद्या काढणे शक्य होत नसल्याने उद्यान विभागाने सहकार्य करावे. नमुद ०८ सागवान वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** श्री.विलास रामभाऊ भागवत, कपिलवस्तु नगर, अमरावती. १ निम वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ पाहणी करण्यात आली असता कडुलिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराला बांधकाम करावयाचे आहे. बांधकाम मंजुरी घेतांना वृक्ष काढण्याचा विचार करता येईल. तुर्त परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. ७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून बांधकाम परवानगी नंतर विचार करण्यात येईल. तुर्त परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** वर्षा शरद महल्ले, वसंत टॉकिज जवळ, अमरावती. १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी करण्यात आली असता वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे. वृक्ष अर्जदाराचे भुखंडाच्या कडेला आहे. कोणतीही अडचण दिसुन आली नाही. वृक्ष तोडल्याचे कारण अर्जात नमुद नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयार्थ सविनय सादर

**ठराव क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९ :-** मोहम्मद मुर्शरफ मो.अशर्रफ, पॅराडाईज कॉलनी, अमरावती. १ सिसम वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, प्रत्यक्ष स्थळी अर्जदाराचे घरा समोरील रस्त्यावर कडेला सिसम वृक्ष आहे. अर्जदाराने विनापरवानगी अवैधपणे वृक्षाच्या मोठ्या फांद्या



Scanned with CamScanner

(६० सेमी व्यासापेक्षा जास्त) काढल्याने वृक्ष वाळल्या सारखा झाला असून नष्ट होण्याचे मार्गावर आहे. चौकशी दरम्यान ४ महिन्यापुर्वी फांद्या काढल्याचे सांगण्यात आले. अर्जदाराचे घराचे अंगणात कचरा पडतो म्हणुन वृक्षाच्या फांद्या काढल्याचे सांगण्यात आले. त्याअनुषंगाने महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ सेक्शन ०५ कलम ८(१), सेक्शन ८ कलम २१(१) (२) नुसार कारवाई का करण्यात येवू नये, याबाबत अर्जदाराला कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. ९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून खुलासा सादर झाल्यानंत पुढील सभेत सादर करावा. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १० :-** शब्बीर हुसैन अली, अलहिलाल कॉलनी, व्ही.एम.व्हि.रोड, अमरावती. २ कडुनिंब, बोराई इमली वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, दोन्ही वृक्ष रस्त्याचे कडेला व हिरवेगार आहेत. वृक्षाच्या फांद्या अर्जदाराने पुर्वीच काढल्याचे दिसून आहे. विचारले असता विद्युत मंडळाने फांद्या काढल्याचे त्यांनी सांगितले. सबब फांद्या काढण्याचे विद्युत मंडळास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. तसेच दोन्ही वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. त्यानुसार उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १० :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून सदर फांद्या काढण्याचे विद्युत मंडळास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे व दोनही वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११ :-** सौ.प्रमिला जावळे, रहाटगांव, अमरावती. २ कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, कडुलिंबाचे ०२ वृक्ष अर्जदाराचे पलॉट (भुखंडामध्ये) छान वाढलेले व हिरवेगार आहे. अर्जदार सौ.जावळे यांनी सदर भुखंड री.सुधीर जामोदकर यांना विकला असून श्री.जामोदकर वृक्ष तोडून मागण्याचा प्रयत्न करीत आहे. जामोदकरांना वृक्ष तोडून पाहिजे आहे. करीता अर्जदाराने (माजी मालकाने) वृक्ष तोडण्यासाठी अर्ज केला आहे. सबब वृक्ष तोडण्यासाठी अर्ज केला आहे. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदार श्री.प्रमिला जावळे व प्लॉट खरेदीदार दोघांनाही वृक्षाला इजा पोचवू नये, वृक्षाला संरक्षण देण्याचे सुचित करावे लागेल. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. ११ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवालाप्रमाणे प्लॉट खरेदीदार यांना पत्र देण्यात यावे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२ :-** श्री.संजय गजभिये, रत्नदिप कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, पिंपळ वृक्ष रस्त्याचे कडेला वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने पिंपळ वृक्षाच्या मोठ-मोठ्या फांद्या अवैधरित्या विनापरवानगी तोडलेल्या दिसुन आल्या. वादळाने फांद्या पडल्याचे अर्जदाराचे म्हणने आहे. परंतु त्यां फांद्या अर्जदारानी कादुन टाकल्या आहेत. सबब विनापरवानगी सार्वजनिक रस्त्यावरील वृक्षाची तोड केल्याचे दिसून येते. याबाबत अर्जदाराला कारणे दाखवा नोटीस बजवावी लागेल तसेच अर्जदाराचे घरी एकही वृक्ष लावण्यात आलेला दिसून आला नाही. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ सेक्शन ०५ कलम ८(१), सेक्शन ८ कलम २१(१) (२) नुसार ०२ वृक्ष लावणे बंधनकारक आहे, याबाबत सुध्दा पत्राव्दारे सुचना द्यावे लागेल.



Scanned with CamScanner

करीता वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी असे अभिप्राय तांत्रिक सदस्य यांचे प्राप्त आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १२ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे संबंधितांना पत्र देण्यात यावे. वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १३ :-** श्री.गोपाल दामोधर धर्माळे, सदाशिव नगर, अर्जुन नगर, अमरावती. १ शिसम वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, सार्वजनिक जागेवर, रस्त्याचे कडेला हिरवागार वृक्ष वाढलेला आहे. शक्तीमान यंत्राव्दारे रस्त्याकडे खाली व विजेच्या खांबावरील फांद्या काढण्यास हरकत नसल्याबाबतचे तांत्रिक सदस्य यांचे अभिप्राय प्राप्त आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १३ :-** म.रा.वि.वि. कंपनी ला पत्र द्यावे व आवश्यकता पडल्यास उद्यान विभागाने शक्तीमानव्दारे मदत करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १४ :-** श्री.अशोक वानखडे, सचिव दिप प्रतिष्ठान कॉलनी, रहाटगांव अमरावती. १ निम वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली त्याच प्रजातीची अथवा स्थानिक प्रजातीची ०३ वृक्ष उद्यान विभागामार्फत लावण्यात यावे. सदर वृक्ष उद्यान विभागाव्दारे शक्तीमान यंत्राणे त्वरीत काढण्याची कार्यवाही करण्याबाबत होणे आवश्यक आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १४ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे शक्तीमान मशिन व्दारे फांद्या काढण्यात याव्या.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १५ :-** सौ.वंदना मडघे, अर्जुन नगर, अमरावती. १ गुलमोहर वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, गुलमोहर वृक्ष रस्त्याचे बाजुला किडलेला, वाळलेला आहे व नालीचे काठावर असून असंतुलीत झाला आहे. त्यास काढण्यास हरकत नसावी. तसेच बाजुलाच कडुलिंब वृक्ष छोटा वाढत आहे. त्यास ट्रिगार्ड लावून उद्यान विभागाने संरक्षित करण्यात यावे. तसेच काढावयाचे वृक्षाचे बदली ०३ वृक्ष अर्जदाराला आपल्या देखरेखीत रस्त्याचे बाजुला लावुन घ्यावेत असे अभिप्राय तांत्रिक सदस्य यांचे प्राप्त आहे. त्यानुसार वृक्ष काढण्याची कार्यवाही उद्यान विभागाने करावी. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे सदर वृक्ष काढण्याची कार्यवाही उद्यान विभागाने करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १६ :-** श्री.प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती. ५० वृक्षांच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, अर्जदाराने त्यांचे परिसरातील झाडाची संख्या अंदाजे टोकलेली आहे. तथापि परिसरातील कोणत्या वृक्षाच्या, कोणत्या बाजुच्या व किती इंच व्यासाच्या फांद्या काढावयाच्या आहेत याची वृक्ष निहाय यादी क्रमांकासह द्यावी व वृक्षाची छायाचित्रे जोडावित. ते प्राप्त झाल्यानंतर फांद्या काढण्याची परवानगी वृक्ष अधिकारी स्तरावरुन यादीसह नमुद करुन



Scanned with CamScanner

देण्यास हरकत नाही असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे याबाबत प्राचार्य यांना सुचित करण्यात आले आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून सहा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन फांद्या काढण्याची परवानगी द्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १७ :-** श्री.मिलींद सि. गवई, नित्यानंद कॉलनी रोहिनी पार्क कठोरा रोड, अमरावती. १ गुलमोहर व १ पिंपळ वृक्ष तोडल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य समवेत स्थळ तपासणी केली असता, अर्जदाराच्या घरासमोरील नियोजित उद्यानासाठी सोडलेली मोकळी जागा आहे. त्या जागेवरील वृक्ष समाजकंटकांनी तोडल्याची तक्रार अर्जदाराची आहे. उद्यान विभागाने सविस्तर चौकशी करुन वृक्ष तोडणाऱ्या विरुध्द कार्यवाही करावी व अहवाल द्यावा. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. प्राथमिक अहवाल उद्यान विभागाकडे पाठवावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १८ :-** श्री.कृष्णराव बोरखडे, होटेल श्रीपादच्या मागे, मोर्शी रोड, अमरावती. ५१४५ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि.३१/१२/२०१९ चे ठराव क्र.१ नुसार नमुद प्रमाणे सागवान वृक्ष काढणेकरीता परवानगी प्रदान करण्यात आली होती. परंतु मा.तांत्रिक सदस्य यांचे व्दारे भ्रमणध्वनी वर प्राप्त सुचना नुसार अर्जदाराला परवानगी प्रदान करण्यात आली नाही. माहिती व उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. १८ :-** याबाबत यापुर्वीच्या सभेत वृक्ष अधिकारी यांचे अहवालाप्रमाणे अर्ज क्र.१ ठराव क्र.१ सभा दि.१७.०२.२०२० प्रमाणे मान्य करण्यात आली होती. सभेत झालेल्या सांगोपांग चर्चेप्रमाणे व वृक्ष अधिकारी यांचे सुचनेप्रमाणे संबंधित झोनचे सहा.आयुक्त यांनी ८४/१ अ, १२८/३ व ८९/२/५ या शेत सर्वे क्र. ची झोन स्तरावरुन परवानगी देतांना एक एक सर्वे क्र. ची परवानगी द्यावी व ज्या सर्वे मधील परवानगी दिल्यानंतर वृक्ष काढण्यात आले त्या सर्वेमधील मागील वृक्ष प्राधिकरण ठरावाच्या अट क्र.४ प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर झोन स्तरावरुनच पुढील परवानगी देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १९ :-** उपविभागिय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, अमरावती. १५१ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि.३१/१२/२०१९ चे ठराव क्र.१३ अन्वये अमरावती मिनी बायपास वरील मनपा उत्तर झोन क्र.१ अंतर्गत येणारे एकुण १५१ वृक्ष काढण्याची परवानगी प्रदान करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दि.१६/०३/२०२० रोजी वृक्ष काढणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. यादरम्यान कोरोना महामारीमुळे सदर रस्त्याचे काम थांबलेले होते व दिलेल्या आदेशाची कार्य मर्यादा संपुष्टात आल्यामुळे अर्जदाराने दि.२०/०५/२०२० रोजी पत्र देवून सदर आदेशावर मुदत वाढची मागणी केली होती. त्याअनुषंगाने दि.२८/०५/२०२० रोजी मा.वृक्ष प्राधिकरण समिती सभा व्दारे देण्यात आलेले अटी/शर्ती सह तसेच मा.आयुक्त, मनपा, अमरावती यांचे दि.२७/०५/२०२० चे आदेशानुसार मुदत वाढ प्रदान करण्यात आली होती. रस्ता नुतनीकरण करतांना काढण्यात येणारे झाडांबाबत नागरीक तसेच पत्रकार मार्फत भ्रमणध्वनी व्दारे वृक्ष तोडीबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर बाब माहिती व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. १९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे प्रथम रस्त्याचे काम सुरु करावे नंतर कार्यवाही बाबत पत्र देण्यात येईल.



Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २०** :- श्री.सम्राट डोंगरदिवे, रहाटगाव, अमरावती. ४ कडूलिंब, १ महारुग, १ बाभुळ वृक्ष अवैधरीत्या काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असता अर्जदाराने अनाधिकृतरित्या नमुद प्रमाणे एकुण ६ वृक्षांची अनाधिकृतरित्या वृक्ष तोड केलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधितास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असता त्यांचे प्राप्त स्पष्टीकण नुसार नमुद जागेचे मालक ते नसल्याने त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येऊ नये असे त्यांचे म्हणणे आहे. सदर्हु जागेचे मुळ मालक जाणुन घेण्याकरीता पत्राव्दारे मा.सहा.संचालक नगररचना, मनपा यांना सुचित करण्यात आले आहे. परंतु अद्यापहि अहवाल प्राप्त झाला नाही. अहवाल त्वरीत उपलब्ध करुन देणेबाबत स.सं.न.र. यांना निर्देशित करावे लागेल. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २०** :- वृक्ष अधिकारी यांच्याअहवालाप्रमाणे ससंनर विभागाने त्वरीत सहा.आयुक्त झोन क्र.१ यांचे पत्राप्रमाणे तातडीने स्थळ निरीक्षण करुन अहवाल द्यावा असे निर्देश देण्यात येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २१** :- हिंदुस्थान इंटरनॅशनल होटल, चित्रा चौक, अमरावती. ३ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - तांत्रिक सदस्य समवेत प्रत्यक्ष स्थळ तपासणी केली असता, वृक्ष कुठे आहे कोणाला दाखविता आले नाही. होटेल मालक नव्हते त्यांची भेट होऊ शकली नाही. अर्जदाराने अर्ज सादर करतावेळेस अर्जासोबत फॉर्म, फोटो, टॅक्स पावती जोडलेली नव्हती. त्याबाबत नमुद होटलचे कर्मचारी श्री.विनोद बुब यांना सुचना देऊन फॉर्म देण्यात आले होते. परंतु अर्जदाराने अद्यापही सुचनांचे पालन न करता फॉर्म व वृक्षांचे फोटो सादर केलेले नाही. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २१** :- संबंधितांना स्मरणपत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २२** :- इकबाल हाजी कासम, नवसारी, अमरावती. ४ बाभुळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - तांत्रिक सदस्य समवेत प्रत्यक्ष स्थळ तपासणी केली असता, अर्जदाराचे खुल्या भुखंडावर नमुद वृक्ष आहे. त्यांना स्थळ दाखविण्याकरीता फोन केला असता अर्जदाराचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे प्रकरण नामंजुर करण्यात यावे असे तांत्रिक सदस्य यांचे अभिप्राय प्राप्त आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २२** :- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे संबंधितास पत्र देवून अर्ज निकाली काढावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २३** :- श्री.राजेंद्र वि.भटकर, अंबिका नगर, तपोवन अमरावती. १ नारळ वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - अर्जदाराचे राहत्या घराच्या कंपाऊंड मध्ये १ नारळ वृक्ष आहे. सदर वृक्षाला लागुन विद्युत तार गेलेल्या आहेत. तसेच नमुद वृक्षामुळे अर्जदाराचे घराच्या कंपाउंडला भेगा पडलेल्या आहेत. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २३** :- तांत्रिक सदस्य सोबत सहा.आयुक्त यांनी पाहणी करुन निर्णय घ्यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २४** :- श्री.बबन ना.बावनेर, राजमाता कॉलनी, रहाटगाव, अमरावती. वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - अर्जदाराने सादर केलेल्या तक्रारीनुसार अर्जदाराचे घरासमोरील विद्युत पोलाजवळ झाडांची फांद्या अस्तव्यस्त रित्या वाढलेल्या आहेत. त्यामुळे लाईटचा प्रकाश व्यवस्थितरीत्या पडत



Scanned with CamScanner

नाही. सदर फांद्या काढण्याबाबत अर्जदाराने अर्जात नमुद केले आहे. करीता नमुद फांद्या उद्यान विभागामार्फत काढणे उचित राहील. अर्जदाराच्या घरासमोरील श्री.रामभाऊ पवार यांनी त्यांचे स्वतःचे घरात असलेले १ सगवान वृक्ष काढलेबाबत सुध्दा नमुद आहे. त्याअनुषंगाने श्री.पवार यांना नियमानुसार नोटीस देण्यात आलेली आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून शक्तीमानव्दारे आवश्यक फांद्या काढून देण्यात याव्या व त्यांना सागवान वृक्षाचे खुलासा सादर केल्यानंतर समितीसमोर ठेवावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २५ :-** भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, अमरावती. वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदाराचे अर्जानुसार मौसमी पावसाचे आगमन सुरु झाले असून नैसर्गिक परिस्थीती लक्षात घेता बालभारती परिसरातील मनपा रोड उंच झाल्यामुळे लगतच्या झाडांच्या फांद्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण करीत आहे. परंतु कोणकोणते वृक्षांची फांद्या रस्त्याचे मधात येत असल्याचे नमुद नाही. सदर प्रकरणी पाहणी करुन याबाबतचा अहवाल पुढील सभेत सादर करण्यात येईल. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २६ :-** सौ.प्रमिला गजानन जाधव, सन्मा.नगरसेविका, प्र.क्र.२ तपोवन, अमरावती. झुडपे काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** प्राप्त पत्रानुसार विद्यापिठ रोड ते नाल्याचे पुलाजवळील वळणावरील कडेला तपोवन संस्थेच्या मालकीचे शेत असून सदर शेताच्या धुरावर मोठमोठी झाडे, झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे वळण्याच्या ठिकाणी धोका निर्माण होऊ शकते. सदर ठिकाणी यापुर्वी सुध्दा अनेक अपघात घडलेले आहेत. करीता सदर झुडपे काढणेबाबत सचिव, विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन यांनी नाहरकत प्रदान केलेली आहे. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे आवश्यक झुडपे काढावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २७ :-** श्री.प्रविण ढगे व इतर आनंद कॉलनी, अमरावती. १ कडुनिंब वृक्षाची फांदी काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली असता १ कडुनिंब वृक्ष रस्त्याचे कडेला हिरवागार व छान वाढलेला आहे. सदर वृक्षाची फांद्या जास्त वाढलेली आहे. सदर फांद्या शक्तीमान यंत्राव्दारे उद्यान विभागामार्फत काढण्यास हरकत नसावी. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २८ :-** श्री.भानुदास अवघड, मोहन नगर, अमरावती. १ कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर प्रकरण वेळेवर प्राप्त झाल्याने पाहणी करता आली नाही. पाहणी करुन पुढील सभेत अहवालासह सादर करता येईल. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २८ :-** तांत्रिक सदस्य यांचे सह पाहणी करुन तांत्रिक सदस्यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned with CamScanner

**अर्ज क्र. २९ :-** प्राचार्य आरोग्य कल्याण प्रशिक्षण केंद्र डफरीन हॉस्पीटल, अमरावती. १ बादाम वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर प्रकरण वेळेवर प्राप्त झाल्याने पाहणी करता आली नाही. पाहणी करुन पुढील सभेत अहवालासह सादर करता येईल. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. २९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३० :-** सौ.कुसुमताई भारत साहु, मा.उपमहापौर तथा सन्मा.नगरसेविका मसानगंज, अमरावती. वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर प्रकरण वेळेवर प्राप्त झाल्याने पाहणी करता आली नाही. सदर फांद्या काढण्याबाबत अर्जदाराने अर्जात नमुद केले आहे. करीता नमुद फांद्या उद्यान विभागामार्फत काढणे उचित राहील. पाहणी करुन पुढील सभेत अहवालासह सादर करता येईल. उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र. ३० :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे उद्यान विभागाने कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**मध्य झोन क्र.२**

**अर्ज क्र. १ :-** श्री.एस.व्ही.बचाटे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती. १ पॅल्टीफार्म, १ कडुबादाम, २ सुबाभुळ एकुण ४ वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२४.०२.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. उद्यान अधिक्षक यांनी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता १ पॅल्टीफार्म वृक्षाच्या पुर्वकडील २ फांद्या टीन शेडमध्ये येणाऱ्या १ कडुबदाम वृक्षाच्या ४-५ इंचाच्या जाडीच्या फांद्या वायरलेस पोल मध्ये गेल्याने वायरलेस अतिशय इमेरजेन्सी सेवा आहे. तसेच आवश्यक अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. व सुबाभुळ २ वृक्ष वाळलेले काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. वृक्ष काढण्याचे वृक्ष प्राधिकरण समिती धोरणानुसार १x३ असे २ वृक्षाच्या बदली ६ वृक्ष प्रजातीची त्याच परिसरात लावण्यात यावे. लावल्या नंतरचा अहवाल Geo Tag सह पाठवून दर सहा महिन्यांनी वृक्ष वाढत असल्याचा अहवाल छायांचित्रासह तीन वर्षे या कार्यालयास सादर करावा. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** डॉ.श्यामसुंदर निकम, जिल्हा चिकित्सक सामान्य रुग्णालय परिसर, अमरावती. १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०२.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- आंब्याचा वृक्ष पाण्याच्या टाकी बांधकामात येत असल्याचे दिसून येते, तसेच बांधकामात दिनांक २७/०२/२०२० नुसार अभियंत्यांनी परवानगी दिल्याचे पत्र सोबत जोडले आहे. सबब १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी खालील अटीवर देण्यात हरकत नाही. १ वृक्षाच्या बदली ३ वृक्ष लावण्यासाठी ३x३४६०=१०३८० (दहा हजार तीनशे अंशी रुपये फक्त) वृक्ष प्राधिकरणाकडे ठेव ठेवल्यांनंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बदली वृक्ष लावल्याचा अहवाल व जगत असल्याचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षे पर्यंत वृक्ष प्राधिकरणाकडे पाठविल्यानंतर ठेव परत करण्यात येईल. अनामत रककम भरुन वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्यत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** सन्मा.श्री.दिनेश बुब, नगरसेवक मनपा, अमरावती. १ आंबा वृक्ष पुन:रोपन करण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** वृक्ष प्राधिकरण समिती सभा वेळेवर आलेले विषय दिनांक ३१/१२/२०१९ ठराव क्र.२ नुसार सन्मा.श्री.दिनेश बुब नगरसेवक मनपा अमरावती यांच्या पत्रानुसार आंब्याचे १ वृक्ष एका जागेवरुन काढुन दुसऱ्या जागेवर लावण्याची परवानगी मागितली आहे. सदर वृक्ष काढुन दुसरीकडे लावण्यात येणारा खर्च सुध्दा संबंधित नगरसेवक त्यांचे स्वेच्छा निधीमधून करण्यास तयार आहे. उद्यान विभागाकडून पाहणी केली असता सदर आंब्याचे वृक्ष काढून पुन:रोपन करुन पाहण्यास हरकत वाटत नाही. आंब्याचे वृक्ष काढून पुर्नरोपन करण्याची कार्यवाही मा.तांत्रिक सदस्य यांच्या अहवालाप्रमाणे तांत्रिक पध्दतीने तपासून करण्यात यावी. सदर बाबत परवानगी देण्यात येत आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** सन्मा.श्री.दिनेश बुब, नगरसेवक मनपा, अमरावती. १ गुलमोहर, १ कडुनलिंब, १ महारुख एकुण ३ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** वृक्ष प्राधिकरण समिती सभा वेळेवर आलेले विषय दिनांक ३१/१२/२०१९ ठराव क्र.१ नुसार सन्मा.श्री.दिनेश बुब नगरसेवक मनपा अमरावती यांच्या पत्रानुसार वृक्ष अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार चित्रा टॉकिज ते सतिधाम कॉम्पलेक्स कडे जाणारा रस्त्यावरील ३ वृक्षाच्या फांद्या काढण्यास सुचविले त्यानुसार गुमोहर-१, कडुनिंब-१, महारुख-१, अशा ३ वृक्षांची ३-४ इंचीच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. सबब मनपा उद्यान विभागाने शक्तीमान यंत्राव्दारे वृक्षाच्या फांद्या कमी करण्याची कार्यवाही करावी. कार्यात्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** श्री.चंद्रशेखर मधुकरराव पत्तेवार, रामनगर, अमरावती. १ अवैध वृक्ष तोड बाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** उपरोक्त आदेशान्वये श्री.चंद्रशेखर मधुकरराव पत्तेवार रामनगर अमरावती यांचा दि.०१/१०/२०१९ विनंती अर्ज दिला ५ वृक्षांची अनामत रक्कम कमी करुन २ वृक्षाची अनामत रक्कम भरण्यास समर्थ आहे असे कळविले. झाडे कुठे लावायचे हे सांगण्यात यावे त्यानुसार वृक्ष प्राधिकरण समिती सभा दिनांक ०४/११/२०१९ ठराव क्र.१८ नुसार अर्ज अमान्य ठरवुन फेटाळण्यात आलेला आहे. कार्यालयाचे पत्र जा.क्र.६१० दिनांक ०७/१२/२०१९ अनामत रकमेचा भरणा उद्यान विभागात भरणा केल्याचे निदर्शनास येत नाही. अनामत रक्कम न भरल्यामुळे मालमत्ता करामध्ये समाविष्ट करण्यात येईल अथवा आपणा विरुध्द भा.द.वि.अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात येईल याबाबत सुचित करण्यात आले आहे. करीता अर्जदारावर पुढील कोणती कार्यवाही करावी याबाबतचे मार्गदर्शनास्तव सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ५ :-** अर्जदारास सुनावनीस बोलावून अर्जदार २ वृक्षाची अनामत रक्कम भरण्यास तयार असल्यास अनामत रक्कम भरुन घेण्यात यावी. व ५ वृक्ष लावण्याबाबत स्थळ सुचवावे. लावण्यात आलेल्या वृक्षांचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षे पर्यंत घेण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** श्री. श्रीराम बळीरामजी अस्वार, प्रशांत नगर, अमरावती. १ वाळलेला नारळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय-वाळलेला नारळ वृक्ष काढण्यास हरकत नाही. त्याबदली परिसरात ३ वृक्ष लावण्यात यावेत व अहवाल वृक्ष प्राधिकरणात पाठवावा. वृक्ष अधिकारी यांच्या मान्यतेनुसार परवानगी प्रदान करण्यात आली. कार्यत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** ई.सी.एच.एस. पॉलिक्लीनीक अमरावती जिल्हा सैनिक गेस्ट हाऊस मोर्शी रोड, अमरावती. १ उंबर, १ पिंपळ, १ महारुग, १ कडुनिंब, १ शंखेश्वर एकुण ५ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- अर्जदाराच्या परिसरात ५ पेक्षा जास्त वृक्ष आहेत. सबब परिसरातील वृक्ष किती व कोणत्या प्रजातीची आहेत याची स्वतंत्र लिस्ट करुन कोणत्या वृक्षाच्या फांद्या काढायच्या व कोणता वृक्ष काढायचा याबाबत निर्णय घेता येईल. कृपया वृक्षावर नंबर टाकुन अहवाल द्यावा. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ७ :-** सदर विषय स्थगित ठेवण्यात येत आहे अहवाल प्राप्त झाल्यानंतर सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** सौ.राखी शशांक काळबांडे, शारदा नगर, अमरावती. १ अशोका वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- अशोका वृक्षाच्या फांद्या वरुन ५ फुटापर्यंत अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्या काढण्याची (वृक्षाला आकार देण्यासाठी) परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्षाला खोलवर इजा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. वृक्ष अधिकारी यांच्या मान्यतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९ :-** श्री.किशोर म.काकाणी, कुसंबा विहार शिलांगण रोड, अमरावती. १ महारुग वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- वृक्ष बांधकामात येतात किंवा कसे याबाबत बांधकाम नकाशा मंजुर करणाऱ्या अभियंतांनी नकाशात दाखविलेले नाही. नियमाप्रमाणे प्रत्यक्ष बांधकामात येणारा वृक्ष लाल रंगानी व बांधकामाबाहेर राहणारा वृक्ष हिरव्या रंगानी चिन्हांकित करणे गरजेचे आहे. परंतु तसे केलेले दिसत नाही, सबब अभियंत्याचा अभिप्राय घ्यावा. वृक्ष तोडण्याची परवानगी तुर्त नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करुन अहवालाप्रमाणे कार्यवाही करावी तुर्त परवानगी नाकारण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १० :-** श्री.महेश जि.बजाज, महालक्ष्मी कॉलनी, अमरावती. ३ सागवान, १ आवळा एकुण ४ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय - वृक्ष बांधकामात येतात किंवा कसे याबाबत सहा.संचालक व्दारा मंजुर केलेले नकाशात दर्शविलेले दिसून येत नाही, वृक्ष बांधकामात प्रत्यक्ष येत असल्यास लाल रंगानी व बांधकामाबाहेर असल्यास हिरव्या रंगाने अभियंत्यांनी चिन्हांकित करुन अहवाल द्यावा, त्यानंतर निर्णय घेता येईल. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. १० :-** झोन क्र.२, चे वेळेवरील विषय/अर्ज क्र.१, शी संबंधित असल्याने याबाबत वेळेवरील विषय क्र.१ वर ठराव करण्यात आलेला आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११ :-** सौ.स्वाती चंद्रशेखर, कुलकर्णी, सन्मा.नगरसेविका प्र.क्र.१३ मनपा अमरावती. १ गुलमोहर वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०९.०३.२०२० रोजी उद्यान अधिक्षक यांनी स्थळ निरीक्षण केले असता, भुतेश्वर चौक ते दुर्गा विहार रोडवरील गणेश कॉनी येथील खारा यांच्या घरासमोरील १ गुलमोहर वृक्षांची फांदी



Scanned with CamScanner

काढण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार उद्यान अधिक्षक यांच्या तपासणी अहवालाचे अधिन राहुन १ वृक्षांची फांदी तोडण्याची परवानगी मा.वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे मार्फत प्रदान करण्यात आल्याने सदर प्रकरणास कार्यत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ११ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२ :-** शैलेश यशवंत गवई, कॅम्प, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी स्थळ निरीक्षण केले असता, १ वृक्ष आडजात कम्पाऊंड वॉल वर झुकलेला आहे, त्यामुळे भिंतीला तडे गेलेले आहे, वादळाने वृक्ष केव्हाही पडू शकतो. वृक्ष आडजात कम्पांऊंड वॉल वर झुकलेला आहे त्यामुळे भिंतीला तडे गेलेले आहे, वादळाणे वृक्ष केव्हाही पडू शकतो. वृक्ष वॉल कम्पाऊंडची भिंतीवर रेस्ट झालेला आहे. भिंत पडल्यास वृक्ष केव्हाही कोसळू शकतो, कोणती जिवीत हानी होवू नये अशी शक्यता वाटत आहे, त्यामुळे वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. एक वृक्षाच्या बदली ३ वृक्ष लावण्यासाठी ३x३४६०=१०३८०(दहा हजार तीनशे ऐंशी रुपये फक्त) वृक्ष प्राधिकरणाकडे ठेव ठेवल्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष प्राधिकरण समिती धोरणानुसार १x३ असे १ वृक्षाच्या बदली ३ वृक्ष प्रजातीची त्याच परिसरात लावण्यात यावे. लावल्या नंतरचा अहवाल जीओ.टॅग सह पाठवून दर सहा महिन्यांनी वृक्ष वाढत असल्याचा अहवाल छायांचित्रासह तीन वर्षे वृक्ष प्राधिकरणाकडे अहवाल पाठविल्यानंतर ठेव परत करण्यात येईल. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. १२ :-** पडणारा वृक्ष काढण्यात यावा व त्याबदली तीन वृक्ष लावण्यात यावे व लावण्यात आलेल्या वृक्षांचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षे पर्यंत सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १३ :-** श्री.रविंद्र सदाशिवराव खर्डेकर, आदिवासी नगर राजापेठ, अमरावती. १ वड, १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय अभियंताचा अहवाल आल्यावर विचार करण्यात यावा. वृक्ष बांधकाम व अतिक्रमण मध्ये येते किंवा नाही याबाबत अहवाल सादर करण्यास कळविले.

**ठराव क्र. १३ :-** सदर विषय स्थगित ठेवण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १४ :-** आयसोलेशन दवाखाना मनपा, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आयसोलेशन दवाखाना मनपा अमरावती परिसरामध्ये १ वृक्ष पडलेले असल्याबाबत कळविले. वृक्ष उचलण्याची कार्यवाही उद्यान विभाग यांच्या मार्फत करण्यात येत आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १५ :-** डॉ.इंचार्ज मनपा, दवाखाना सबनिस प्लॉट, अमरावती. १ निलगीरी वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** डॉ.इंचार्ज मनपा दवाखाना सबनिस प्लॉट, अमरावती परिसरमधील एक निलगिरी वृक्षाच्या फांद्या तोडण्याबाबत अर्जदाराने नमुद केले आहे. सार्वजनकि जागेवरील फांद्या तोडण्याची कार्यवाही उद्यान विभाग यांच्या मार्फत करण्यात येत आहे. वृक्ष अधिकारी यांच्या मान्यतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned with CamScanner

**अर्ज क्र. १६** :- श्री.संजय घारु, बेलपुरा, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२१/०५/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय - वृक्ष सार्वजनिक जागेवर आहे. उपरोक्त टिपणीवरुन स्पष्ट होते की, मंदीराजवळ लोकांनी लावलेला वृक्ष आहे. सबब अस्तावस्त वाढलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उद्यान विभागाचे मार्गदर्शनास आवश्यक त्या फांद्या काढण्यास हरकत नाही. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच वृक्षाच्या बुडाजवळचे सर्व काँक्रीट मोकळे करावे. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १६** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १७** :- गट मुख्यालय राष्ट्रिय छात्र सेना एन सी सी भवन, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** गट मुख्यालय राष्ट्रिय छात्र सेना एन सी सी भवन अमरावती परिसरामध्ये पडलेल्या झाडांची विल्हेवाट लावण्याबाबत अर्जामध्ये नमुद केले, त्यानुसार हिंदु स्मशान संस्था अमरावती यांना वृक्षाची विल्हेवाट लावण्याची वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार पत्र देण्यात आले. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १७** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १८** :- तफइझुल तुराबऊली हसनजी काझी कंपाऊंड डेपो रोड, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आज दिनांक २२/०५/२०२० रोजी तांत्रिक सदस्य यांच्याशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधून कडूनिंबाचे वाळलेले वृक्ष तोडण्याची विचारणा केली असता त्यांनी एक वृक्ष तोडण्याचे सुचविले आहे. तरीही १ वृक्ष वाळलेले असून काढण्याची परवानगी देण्यात यावी. वृक्ष प्राधिकरण धोरणानुसार १x३ असे १ वृक्षाच्या बदली ३ वृक्ष प्रजातीची त्याच परिसरात लावण्यात यावी. लावल्यानंतरचा अहवाल जीयो टॅग सह पाठवुन दर सहा महिन्यांनी वृक्ष वाढत असलचा अहवाल छायाचित्रासह ३ वर्षे वृक्ष अधिकारी या कार्यालयास सादर करावा,असे सुचविले आहे. वृक्ष अधिकारी यांच्या मान्यतेनुसार परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १८** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १९** :- डॉ.राहुल बाबाराव लोखंडे खापर्डे बगीचा, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०३/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय कडूनिंब वृक्ष अर्जदाराच्या परिसरात वाळलेला आहे. वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. सदर वृक्षाचे बदली ३ वृक्ष अर्जदाराने आपल्या परिसरात लावून अहवाल पाठविण्याचे बजावण्यात यावे. वृक्ष प्राधिकरण धोरणानुसार १x३ असे १ वृक्षाच्या बदली ३ वृक्ष प्रजातीची त्याच परिसरात लावण्यात याव. लावल्यानंतरचा अहवाल जीयो टॅगसह पाठवून दर सहा महिन्यांनी वृक्ष वाढत असल्याचा अहवाल छायाचित्रासह ३ वर्षे वृक्ष अधिकारी या कार्यालयास सादर करावा, असे सुचविले आहे. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १९** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned with CamScanner

**अर्ज क्र. २०** :- श्रीमती गिरीजा सुधाकर आमलेकर, नारायण नगर, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - दि.०३/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय विद्युत तारेकडे झुकलेला २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष अधिकारी यांच्या मान्यतेनुसार परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २०** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २१** :- श्री.हडाले, श्री.धामणे व सर्व नागरीक शाम बाबा मंदीर बेलपुरा, अमरावती. १ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - दि.२९/०५/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या २-३ इंज व्यासाच्या दक्षिणेकडे फांद्या काढण्यास हरकत नाही. वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आंल आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २१** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २२** :- कुशाल एस. व्यास, बालाजी प्लॉट, सिताराम मंदीराजवळ, अमरावती. १ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - दि.२९/०५/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय पिंपळ वृक्ष सार्वजनिक जागेवर आहे असे प्रथम दर्शनी दिसून येते. अतिक्रमण असल्यास त्वरीत हटवून वृक्ष मोकळा करावा, मनपा शक्तीमान व्दारा फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २२** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २३** :- सौ.शारदा सुरेश झंवर रुख्मीनी नगर, अमरावती. १ गुलमोहर वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - दि.२९/०५/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय वृक्ष सार्वजनिक रस्त्याचे कडेला व हिरवागार आहे मनपाचे शक्तीमान व्दारा विद्युत तारेकडे व घराकडे झुकलेल्या फांद्या ३ इंच व्यासापर्यंत काढण्यास हरकत नाही. वृक्ष अधिकारी यांच्या मान्यतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २३** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २४** :- श्री.इंधाने व इतर नागरीक गांधी नगर परिसर, अमरावती. १ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** - दि.१५/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय वृक्ष नालीच्या काठावर सार्वजनिक जागेवर असल्याचे दिसून येते. लोकांनी फांद्या काढलेलया दिसून आल्या फांद्या काढण्याचे कामास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी.

**ठराव क्र. २४** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २५ :-** देवानंद वि.साबळकर, राजमाता नगर, टोपे नगर, अमरावती. १ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१२/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय वृक्ष घराकडे झुकलेला व घरावर रेस्ट झालेलया फांद्या तोडण्यास हरकत नाही. २-३ इंच व्यासाच्या फांद्या वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची काळजी घेवून काढाव्यात. वृक्ष ज्यांच्या आवारात आहे त्यांना सुचित करा व नगतरच फांद्या काढाव्यात असे सुचित करण्यात आले वृक्ष अधिकारी यांच्या आन्येतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २६ :-** श्री.अजय भेरडे, गोविंद नगर, अमरावती. १ बेलवृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१२/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय बेल वृक्षाच्या विद्युत तारेकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २७ :-** श्रीमती सुरेखा बोंडे, रख्मीनी नगर, अमरावती. २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१५/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय २ सागवान वृक्ष परिपक्व झालेले आहेत बदली २ वृक्ष लावण्यासाठी रुपये ६९२०/- (सहा हजार नऊशे वीस रुपये) परत मिळणारी ठेव ठेवल्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी धोरणाधिन राहुन देण्यात यावी. वृक्ष लागवडीचा अहवाल GPS फोटोग्राफ सह तीन वर्षे पर्यंत पाठविल्यांनतर ठेव परत मिळेल. अर्जदाराला बांधकाम करायचे आहे, असे अर्जात नमुद आहे. तथापि टीन शेड आकायचे आहे असे सांगीतले. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्वत सादर.

**ठराव क्र. २७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून परवानगी देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २८ :-** उप विभाग अभियंता सा.बां. उपविभाग क्र.१, अमरावती. २ कडूलिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अमरावती मनपा क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ विवेकानंद कॉलनी येथील मनपा अमरावती खुल्या जागेवर बगीच्या मध्ये वाचनालय हॉल चे बांधकाम करणे बाबत वृक्ष प्राधिकरण सभा दिनांक १७/०२/२०२० ठराव क्र.९ नुसार उपअभियंता यांचा दि.०३.०३.२०२० रोजी अहवाल प्राप्त झाला त्यानुसार एक कडूनिंब वृक्ष तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात येत आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. व संबंधितास ठेव बाबत नियम कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २९ :-** उप विभागीय अभियंता सा.बां. उपविभाग क्र.१, अमरावती. ३ अशोका, २ चांदीचे एकुण ५ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.



Scanned with CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्रीकृष्ण पेठ येथील आय टी आय ते चोरडीया हॉस्पीटल पर्यंत नालीचे बांधकामाबाबत मा.उपअभियंताचा मध्य झोन क्र.२ यांचा अहवाल नालीचे बांधकाम करण्याकरीता ३ अशोका, २ चांदीचे वृक्ष नालीचे बांधकामामध्ये येत असल्याबाबत असा अहवाल प्राप्त झाला त्यानुसार मा.आयुक्त यांचे मान्येतेनुसार परवानगी देण्यात आली. वृक्ष प्राधिकरण धोरणानुसार ५x३=१५, ३४६०x१५=५१९००/- ठेव कार्य पुर्ण झाल्यानंतर व कार्यालयीन कार्यवाही पुर्ण केल्यावर अदा करण्याच्या अटीवर एकुण ५ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. २९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३० :-** श्री.विनोद हिम्मतराव रामेकर, मालु लेआऊट राम नगर जवळ अमरावती. १ पिंपळ वृक्ष अवैध काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री.हडाले स्वास्थ निरीक्षक यांच्या अहवालानुसार मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय, श्री.विनोद हिम्मतराव रामेकर यांनी पिंपळाचे वृक्ष विना परवानगी तोडल्याचे दिसून येते वॉल कंम्पाऊंड समोरील रस्त्याच्या कडेला एक पिंपह वृक्ष होते. तथापी श्री.विनोद हिम्मतराव रामेकर यांनी अवैध वृक्षतोड करुन वृक्षाचे लाकुड देखील गायब केले. सबब नागरीक्षेत्र झाडाचे जतन व संरक्षण अधिनियमानुसार नोटीस देण्यात आली होती. श्री.रामेकर यांनी दि.०१/०६/२०२० रोजी त्याचा खुलासा देवून सादर केलेले आहे. सदर खुलासा नाकारण्यात यावा व अवैध वृक्षतोड केल्याबाबत ५०००/- रु.दंड व त्याबदली ३ वृक्ष लावण्याचे फर्माविण्यात यावे तसेच ३ वृक्ष तावून जगविण्याची हमी म्हणून ३x३४६०=१०३८० रुपये ठेव म्हणून वृक्ष प्राधिकरणाकडे ठेवण्याचे फर्माविण्यात यावे. वृक्ष लावून वाढविण्यात आल्या नंतर ३ वर्षांनी ठेव परत करता येईल. असे एकुण १५३८० (पंधरा हजार तीनशे ऐंशी रुपये) वृक्ष प्राधिकरणाकडे जमा करण्याचे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३० :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३१ :-** श्री.राजेश राघाणी, ग्रीन पार्क कॉलनी, नागरकर दवाखाना मागे, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष अवैध काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री. फुके स्वास्थ निरीक्षक यांचा अहवालानुसार मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय श्री.राजेश राघाणी यांनी कडूनिंब वृक्ष विना परवानगी तोडल्याचे दिसून येते. वृक्ष हिरवागार आहे रस्त्याच्या कडेला होता. तथापी श्री.राजेश राघाणी यांनी अवैध वृक्षतोड करुन वृक्षाचे लाकुड देखील गायब केले. सबब नागरीक्षेत्र झाडाचे जतन व संरक्षण अधिनियमानुसार नोटीस देण्यात आली होती. श्री.राजेश राघाणी यांना दि.१२.०६.२०२० रोजी सादर केले आहे. सदर खुलासा नाकारण्यात यावा व अवैध वृक्षतोड केल्याबाबत ५०००/- रु दंड व त्याबदली ३ वृक्ष लावण्याचे फर्माविण्यात यावे तसेच ३ वृक्ष लावून जगविण्याची हमी म्हणून ३x३४६०=१०३८० रुपये ठेव म्हणून वृक्ष प्राधिकरणाकडे ठेवण्याचे फर्माविण्यात यावे. वृक्ष लावून वाढविण्यात आल्या नंतर ३ वर्षांनी ठेव परत करता येईल. असे एकुण १५३८०(पंधरा हजार तीनशे ऐंशी रुपये) वृक्ष प्राधिकरणाकडे जमा करण्याचे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३१ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३२ :-** श्री.नितीन रमेश वडतकर, पन्नालाल नगर चक्की, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष अवैध काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री.पळसकर स्वास्थ निरीक्षक यांच्या अहवालानुसार मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय श्री.नितीन रमेश वडतकर यांनी कडूनिंब वृक्ष विना परवानगी तोडल्याचे दिसून येते. वृक्ष



Scanned with CamScanner

हिरवागार असून अर्जदाराच्या घरामागे नाल्याच्या काठावर होता तथापि श्री.नितीन रमेश वडतकर यांनी अवैध वृक्षतोड करुन वृक्षाचे लाकुड कापुन नाल्यामध्ये टाकले सबब नागरीक्षेत्र झाडाचे जतन व संरक्षण अधिनियमानुसार नोटीस देण्यात आली होती. तरी श्री.वडतकर यांनी दि.१५.०६.२०२० रोजी त्यांचा खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासा नाकारण्यात यावा व अवैध वृक्षतोड केल्याबाबत ५०००/- रु. दंड व त्याबदली ३ वृक्ष लावण्याचे फर्माविण्यात यावे तसेच ३ वृक्ष लावून जगविण्याची हमी म्हणून ३x३४६०=१०३८० रुपये ठेव म्हणून वृक्ष प्राधिकरणाकडे ठेवण्याचे फर्माविण्यात यावे. वृक्ष लावून वाढविण्यात आल्या नंतर ३ वर्षांनी ठेव परत करता येईल. असे एकुण १५३८०(पंधरा हजार तीनशे ऐंशी रुपये) वृक्ष प्राधिकरणाकडे जमा करण्याचे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३२ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३३ :-** श्री.निशिकांत काळे, रुख्मीनी नगर, मनपा शाळा क्र.९९ जवळ अमरावती. १ आंबा वृक्ष च्या फांद्याअवैध काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री.चावरे स्वास्थ निरीक्षक यांच्या अहवालानुसार दि.११/०६/२०२० जा.क्र.७८, १ आंबा अवैध वृक्ष फांद्या तोडलेबाबत पत्र देण्यात आले त्यांनुसार त्यांनी वादळाच्या वेळी मोठ्या फांद्या तोडलेबाबत पत्र देण्यात आले त्यानुसार त्यांनी वादळाच्या वेळी मोठ्या फांद्या १० जुनला वाऱ्याच्या दाबामुळे तुटफन पडल्या त्याचप्रमाणे २ जुन रोजी थोड्या वाऱ्याने झाडाच्या पाच फांद्या तुटल्या, फांद्या पडल्यामुळे माझ्या निंवासी इमारतीचेही काही नुकसान झाले असे अर्जामध्ये नमुद केले आहे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३३ :-** पुन्हा स्थळ पाहणी करावी व यापुढे असे करुन नये असे कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३४ :-** श्री.मुस्तफा कोठावाला, पेट्रोल पंप, मोर्शी रोड, अमरावती. १ आंबा वृक्ष च्या फांद्याअवैध काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** उद्यान अधिक्षक यांच्या भ्रमणध्वनीव्दारा प्राप्त तक्रार दिनांक १९/०६/२०२० जा.क्र.७७, १ आंबा अवैध वृक्ष फांद्या तोडलेबाबत पत्र देण्यात आले त्यानुसार अहवाल प्राप्त झाला नाही. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३४ :-** अंतिम स्मरणपत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३५ :-** श्री.शांताराम नथ्थुजी इंगळकर, बापटवाडी, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१०/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- वृक्ष सर्व्हिस गल्ली मध्ये दिसून येतो, फांद्या काढण्याची परवानगी मनपाचे स्वच्छता निरीक्षक यांचे मार्गदर्शनात शक्तीमानव्दारा काढण्यास हरकत नाही. अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ३५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३६ :-** श्री.दिपक प्र.गंगाखेडकर, अंबापेठ, मणीबाई शाळेमागे शिवमंदिर, अमरावती. १ बकान वृक्ष च्या फांद्या काढण्याची काढण्याची परवानगी मिळणेबाबत.



Scanned with CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१०/०६/२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- बकान वृक्षाच्या विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष अधिकारी यांच्या मान्येतेनुसार फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ३६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३७ :-** श्री.प्रदिप प्रभाकर देशपांडे, खापर्डे बगीचा, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.उद्यान अधिक्षक व सहा.क्षेत्रीय अधिकारी यांनी स्थळ निरीक्षण केले असता दक्षिणेकडील १ व उत्तरेकडील १ अशा २ फांद्या धोकादायक असल्यामुळे २ फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३७ :-** २ फांद्या काढण्याची परवानगी देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३८ :-** श्री.विष्णू लांडे, अंबिका नगर, शाळा क्र.१६, अमरावती. १ काशिद वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अंबिका नगर, हिंदी शाळा क्र.१३, मराठी शाळा क्र.१६ मनपा अमरावती येथील एक वाळलेले वृक्ष याबाबत अर्ज प्राप्त झाला. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३८ :-** वृक्ष काढण्यात आलेला आहे, मुख्याध्यापकांना झाडे लावण्याबाबत आदेशित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**मध्य झोन क्र.२, वेळेवरील विषय -**

**अर्ज क्र. १ :-** श्री.महेश जी.बजाज, महालक्ष्मी कॉलनी, अमरावती. ३ सागवान १ बदाम वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०१.०७.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय अभियंता श्री.तिखीले व वृक्ष अधिकाराचे प्रतिनीधी हजर होते. अर्जदाराला घराचे प्रतिनीधी हजर होते. अर्जदाराला घराचे बांधकाम करावयाचे असून घराचा नकाशा ससंनर मनपा यांनी मान्यता दिलेली आहे. अर्जदाराचे प्लॉट मध्ये चार सागवान १ बदाम, ४ अशोका, १ आवळा, १ कडूनिंब असे एकूण ११ वृक्ष आहेत. त्यापैकी प्रत्यक्ष बांधकामात येणारे ३ सागवान व १ बदाम वृक्ष असून ही चारही वृक्ष काढण्याची परवानगी खालील अटीवर देण्यास हरकत नाही. १) अर्जदाराने प्लॉटमध्ये असलेली उर्वरीत सात वृक्ष वाचवायची आहेत. २) काढावयाचे ३ सागवान वृक्षाचे बदली धोरणानुसार ३ वृक्ष व १ बदाम वृक्षाचे बदली १x३=३ वृक्ष स्थानिक प्रजातीचे एकुण ६ वृक्ष लागवड करुन अहवाल पाठविणे आवश्यक आहे त्याकरीता ठेव म्हणून ६x३४६०=२०७६० (वीस हजार सहासे साठ) रुपये फक्त वृक्ष प्राधिकरणाकडे जमा करावी. त्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बदली वृक्ष लावल्याचा अहवाल व जगत असल्याचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षे पर्यंत वृक्ष प्राधिकरणाकडे पाठविल्यानंतर ठेव परत करण्यात येईल. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांनी वेळेवर सादर केलेला विषय प्रमाणे सदर अहवाल मान्य करण्यात येत असून विषय पत्रिकेवरील झोन क्र.२ विषय/अर्ज क्र.१० चे ठराव क्र.१० संबंधित विषयाशी जोडण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned with CamScanner

**अर्ज क्र. २ :-** श्री.मनमोहन राधाकिसन बंग, पन्नालाल नगर, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०१.०७.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय विद्युत तारेवर झुकलेल्या चार इंच व्यासापर्यंत फांद्या काढण्यास हरकत नाही. विद्युत मंडळाचे सहकार्याने फांद्या काढण्याची कारवाई करण्यात यावी. झाडाचा तोल बिघडणार नांही याची काळजी घ्यावी. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. २ :-** म.रा.वि.वि. कंपणीला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.प्रदीप प्रभाकर देशपांडे, खापर्डे बगीचा, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** उपरोक्त आदेशान्वये उद्यान अधिक्षक यांचे सह स्थळ नीरीक्षण करण्यात आले असता अर्जदार यांनी दिनांक २६.०६.२०२० रोजी दिलेल्या पत्रानुसार सदर कडूनिंबाचे झाड हे चांगल्या स्थितीत आहे यास्तव अर्जदाराचे दिनांक १६.०८.२०१८ चे वृक्ष तोडीचे अर्जावर दिनांक १९.०९.२०१८ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीमधील ठराव क्र.६ नुसार वृक्ष तोडीचे बदल्यात अनामत रक्कम भरण्याचे निर्णयानुसार अर्जदारास कळविण्यात आले परंतु रक्कम भरण्यात आली नाही व सदर झाड सुरक्षित ठेवण्यात आले. करीता सदर वृक्ष तोडीचे बदल्यात आकारण्यात आलेली अनामतन रक्कम (ठेव) रद्द करण्याचे व प्रकरण बंद करण्याचे कार्यवाहीस्तव वृक्ष प्राधिकरण समिती सभेसमोर उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालास मान्यता देण्यात येत असून सदर अनामत रक्कम रद्द करुन नस्ती बंद करण्यात यावी व संबंधितास तसे कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पुर्व झोन क्र.३**

**अर्ज क्र. १ :-** श्री.गौरव गुलवाडे, व्यंकटेश कॉलनी, अमरावती. १ नारळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२४.०६.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, नारळाचा वृक्ष छान वाढलेला आहे. वृक्षाच्या बुडाजवळ कॉंक्रिट केले आहे. ते काढण्याच्या सुचना देण्यात याव्यात. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.सतिष शर्मा, प्रसाद कॉलनी, अमरावती. १ बदाम वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर वृक्ष घराच्या बांधकामात येते किंवा कसे हे तपासणी करीता सदर प्रकरण बांधकाम विभागामध्ये दि.२२.०६.२०२० रोजी पाठविण्यात आले आहे.

**ठराव क्र. २ :-** सदर वृक्ष बांधकामात येतो किंवा कसे हे बांधकाम/ससंनर विभागाने तातडीने तपासून द्यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** फ्रेजरपुरा परिसरातील नागरीक यांचा अर्ज, अमरावती. १ गुलमोहर वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** विद्युत वाहीनीवर येणाऱ्या फांद्या छाटण्याकरीता विद्युत वितरण विभागास तारावर येणाऱ्या फांद्या छाटुन देण्याची परवानगी जा.क्र.२०/२० दि.०८.०६.२०२० रोजी देण्यात आली आहे.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned with CamScanner

**अर्ज क्र. ४ :-** श्री.अरुण अटाळकर, किरण नगर, अमरावती. १ सेमर वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सदस्य यांचे अहवालानुसार कोरोना महामारी संकट संपल्या नंतर वृक्षाची रासायनिक तपासणी केल्या जाईल सबब तुर्त वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. त्याप्रमाणे सदर अर्जदार यांना जा.क्र.१८/२० दि.०४.०६.२०२० रोजी वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.
**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** श्री.संजय बारसकर, फ्रेजरपुरा, अमरावती. २ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मंदिर परीसरातील घरावर अर्धवट तुटुन पडलेली मनपा कंत्राटदार यांचे मार्फत तोडून देण्यात आली आहे. जा.क्र.१४/२० नुसार दि.०४.०६.२०२० रोजी मंदिर आवाराच्या परिसरात असलेले १ वृक्ष तोडणची परवानगी नाकारण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.
**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** सन्मा.नगरसेविका संध्याताई टिकले प्र.क्र.१० मनपा, अमरावती. १ कडूनिंब, १ काटसावर वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सन्मा.नगरसेविका यांचे प्रभागातील चैतन्य कॉलनी येथील सार्वजनिक रस्त्यांवर असलेले कडूनिंब वृक्षाची १ फांदी झुकलेल्या अवस्थेत असल्यामुळे व दस्तुर नगर ते छत्री तलाव रोड असलेले काटसावर वृक्ष तोडण्याची परवानगी श्री.अकिल शेख रमजान मनपा कंत्राटदार यांना वृक्षाची १ फांदी व १ धोकादायक वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.
**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** श्री.रामदास वसंता माहताव, सुदर्शन कॉलनी, फ्रेजरपुरा, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सदस्य यांचे अहवालाप्रमाणे २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.
**ठराव क्र. ७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** सौ.साधना हटकर, यशोदा नगर नं.१, अमरावती. १ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सन्मा.नगरसेविका जयश्रीताई कुऱ्हेकर उपस्थित होत्या. येणाऱ्या वृक्ष प्राधिकरण सभेत चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत सादर.
**ठराव क्र. ८ :-** तांत्रिक सदस्य यांनी परवानगी नाकारली आहे. अळथडा होत असल्यास तपासावे, वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे सह तांत्रिक सदस्य व सन्मा.श्री.अजय गोंडाणे निर्णय घेतील. सहा.आयुक्त यांनी निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९ :-** श्री.हेमंत रामभाऊ जोशी, विजय कॉलनी, अमरावती. १ वाळलेला सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.



Scanned with CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सदस्य यांच्या हवालाप्रमाणे जा.क्र.१९/२० दि.०४.०६.२०२० नुसार १ वाळलेले सागवान तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. व त्याबदल्यात २ वृक्ष लावण्याचे फरमाविण्यात आले आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र. ९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १० :-** श्री.जियाऊल्ला खान यांनी मा.आयुक्त यांचे कडे प्राप्त तक्रार, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर तक्रारीनुसार भाग्यश्री कॉलनी येथील १ वृक्षाला धडक देवून वृक्षाची हानी केली आहे. संबंधित ट्रक चालकाची माहिती काढण्याकरीता प्रादेशिक परिवहन विभाग अमरावती यांचेकडे सदर ट्रक ची नोंदणी कोणाच्या नावे आहे याची माहिती जा.क्र.३२/२० दि.१९.०६.२०२० मागीतली आहे.

**ठराव क्र. १० :-** अर्जदाराला स्मरणपत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११ :-** श्री.विकास गणेशराव चवरे, फ्रेजरपुरा व परिसरातील नागरीक, अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२४.०६.२०२० रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता विद्युत तारेवर झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. त्यानुसार विद्युत वितरण विभागास तारावर येणाऱ्या फांद्या छाटुन देण्याची परवानगी जा.क्र.३७/२० दि.२५.०६.२०२० रोजी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र. ११ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२ :-** श्री.सुखदेव बळीराम नागदिवे, फ्रेजरपुरा व परिसरातील नागरीक, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर वृक्षाच्या फांद्या विद्युत तारेवर असल्यामुळे विद्युत वितरण विभागास तारावर येणाऱ्या फांद्या छाटुण देण्याची परवानगी जा.क्र.३४/२० दि.२२.०६.२०२० रोजी देण्यात आली आहे. कृपयां कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र. १२ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १३ :-** श्री.संजय ठाकरे, कलोती नगर, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.तांत्रिक सदस्य यांचे अहवालाप्रमाणे विद्युत तारेवर येणाऱ्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या विद्युत मंडळाच्या मार्फत काढण्यात याव्यात. त्यानुसार विद्युत वितरण विभागास तारावर येणाऱ्या फांद्या छाटुन देण्याची परवानगी जा.क्र.३७/२० दि.२५.०६.२०२० रोजी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी.

**ठराव क्र. १३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पुर्व झोन क्र.३, वेळेवरील विषय :-**

**अर्ज क्र. १ :-** श्री.एस.के.डोंगरे(स्वा.नि.), अमरावती. २ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री.एस.के.डोंगरे(स्वा.नि.) यांनी दिलेल्या अनुवृत्ती पत्रानुसार प्रसाद कॉलनी मनपा उद्यानातील नरसम्मा कॉलेज च्या परिसरात झुकलेल्या अवस्थेत असलेल्या २ झाडाच्या फांद्या



Scanned with CamScanner

तोडण्याकरीता जा.क्र.४०/२० दि.२७.०६.२०२० नुसार उद्यान विभागाला परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मान्यता देण्यात यावी.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.शेख हनीफ शेख महेबुब, वडाळी अमरावती. १ कडूलिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** कडुलिंब वृक्ष सार्वजनिक जागेवर असून हिरवागार व छान वाढलेला आहे. घराकडील खाली झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.चिंदुलाल सुहागपुरे, यशोदा नगर नं.२ अमरावती. १ कडूलिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** कडुलिंब वृक्ष छान वाढलेला आहे. घराकडे व विद्युत तारेवर आलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. विद्युत मंडळाचे सहकार्य घेवून फांद्या काढण्यात याव्यात.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** सौ.ज्योतीबाई दिवाकर मेश्राम, एकता नगर, अमरावती. १ पिंपळ, १ चिंच वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** पिंपळ वृक्ष व चिंच वृक्ष छान वाढलेला आहे. रस्ता ५ ते ६ फुट रुंद आहे. रस्ता वाढवायचा असल्यास वृक्ष काढता येईल. अन्यथा वृक्ष काढण्याची गरज नाही. वृक्षाला ईजा पोहचू नये असे फरमाविण्यात यावे. व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** शैलेश ठाकुर, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री.शैलेश ठाकुर यांनी शेतामधील झाड तोडण्याची परवानगी मागीतली आहे.

**ठराव क्र. ५ :-** सदर विषय दाखल करुन घेण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** श्री.येवतीकर, उद्यान अधिक्षक मनपा अमरावती. ४ वृक्षाची अर्धवट छाटणी केल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** श्री.येवतीकर, उद्यान अधिक्षक यांच्या सुचनेवरुन उत्कर्ष सोसायटी येथे पाहणी केली असता चार वृक्षाची अर्धवट छाटणी केलेली आढळली आहे. त्यावर उत्कर्ष सोसायटीचे सचिव यांना खुलासा सादर केला.

**ठराव क्र. ६ :-** पुढील सभेत सविस्तर अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**दक्षिण झोन क्र.४**

**अर्ज क्र. १ :-** श्री.गणेश किसनराव कुत्तरमारे, वृंदावन कॉलनी साई नगर, अमरावती. १ कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - कडुनिंबाचे वृक्ष मनपा उद्यानात सार्वजनिक जागेवर असून छान वाढलेला आहे. मनपाचे शक्तीमान



Scanned with CamScanner

यंत्राव्दारे आवश्यक त्या फांद्या सोलर करीता पुर्वीच काढल्या आहे. सबब फांद्या तोडण्यास कार्योत्तर परवानगी देण्यास हरकत नाही. अहवालानुसार कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. १ :-** आवश्यक्ते प्रमाणे सोलर पॅनला अळथडा करणाऱ्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.रमेश पांडुरंग कुयरे, विमल नगर, दस्तुर नगर अमरावती. ३ सागवान, १ सुईबाभुळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदाराकडील तीन साग वृक्षापैकी एक परिपक्व झालेल्या दक्षिणेकील वृक्ष काढण्याची धोरणाअधिन राहुन परवानगी देण्यास हरकत नाही. (१x१=१x३४६०=३४६०/- रुपये फक्त) ठेव ठेवून एक वृक्ष लावण्याचे सुचित करण्यात यावे. तसेच सुईबाभुळ वृक्ष अर्जदाराच्या जागेबाहेर आहे. व उंच वाढलेला व वाकलेला आहे. तो वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली तीन वृक्ष लावण्याचे फरमाविण्यात यावे. अहवालानुसार वृक्ष काढण्याच्या मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.सरस्वती विद्यालय, विद्यापिठ कॉलनी, एम आय डी सी रोड, अमरावती. कडूनिंब, गुलमोहर व इतर असे एकूण १७ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - शाळेच्या पश्चिमेडील असलेल्या वृक्षांच्या तारेला स्पर्श करणाऱ्या दोन वृक्षांच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या शक्तीमान यंत्राव्दारे काढण्यास सोईचे होईल. अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढण्याच्या मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. ३ :-** म.रा.वि.वि.कंपणीला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** श्री.अशोक गंगारामजी दारा, समाज मंदिराजवळ दस्तुर नगर अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - पिंपळ वृक्ष छान वाळलेला व हिरवागार आहे. वृक्ष सार्वजनिक जागेवर ५० वर्षापासूनचा असल्याने अर्जदाराने नमुद केले आहे. झाडाजवळ बांधकाम केल्याचे दिसून येते सबब सार्वजनिक जागेवर अतिक्रमण झाले किंवा कसे ? याची शहानिशा संबंधित अभियंता यांनी करुन तसा अहवाल द्यावा. तसेच झाडाच्या बुडापर्यंत वेढलेले काँक्रीट हटविण्यास सोईचे होईल, अर्जदाराच्या घराकडील फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. अहवालानुसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** श्री.राजेंद्र देविदास वानखडे, सामरा नगर, अमरावती. २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदाराला बांधकाम करावयाचे आहे असे दिसून येते. सबब अर्जदाराला बांधकामाची परवानगी घेण्यासाठी सुचविण्यात यावे. घर बांधकामाची परवानगी मिळाल्यानंतर वृक्ष काढण्याबाबत विचार करता येईल. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व वृक्षाला कोणत्याही प्रकारची इजा पोहचु नये असे फरमाविण्यात यावे. अहवालानुसार वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्याकरीता सादर.



Scanned with CamScanner

**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** श्री.गजेंद्र प्रल्हाद कडु, अकोली रोड साई नगर, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराचे घराचे नविन बांधकाम विना परवानगी प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदाराच्या घराचा फ्रन्ट झाडामुळे झाकला जातो म्हणुन अर्जदाराने पुर्वीच मोठ्या प्रमाणात वृक्षाच्या फांद्या तोडून टाकल्या असून खोड शिल्लक ठेवले आहे. फोटो पहावा. सबब अर्जदाराला कारणेदाखवा नोटिस बजावून ५०००/- रुपये दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. अहवालानुसार वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** श्री.जयहिंद सिनेमागृह, नवीवस्ती बडनेरा येथील २ पिंपळ व २ इतर एकुण ४ वृक्ष अवैधरित्या काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मा.सहा.आयुक्त, दक्षिण झोन क्र.४ बडनेरा यांनी दि.१९.०३.२०२० रोजी सदर जागेची पाहणी केली असता जयहिंद सिनेमागृह येथील २ पिंपळाचे व २ इतर प्रजातीचे झाडाची अवैधरित्या कटाई करण्यात आल्याचे दिसून आले. सबब संबंधित मालमत्ता धारकास श्री.प्रकाश झंवर रा.जवाहर रोड, अमरावती यांना महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार दंडात्मक कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबत दि.१९.०३.२०२० रोजी नोटीस बजाविण्यात आली आहे. आपल्या माहिती व पुढील कार्यवाही करीता सादर.

**ठराव क्र. ७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. नोटीसचे उत्तर पुढील सभेत सादर करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** श्री.अजय जयदेव लोखंडे, कैलास नगर गोपाल नगर, अमरावती. स्थानिक प्रजातीचे १ वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल - विद्युत तारेकडे झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही, वृक्ष सार्वजनिक जागेवर असल्याने वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची काळजी घेण्यात यावी, विद्युत मंडळाने सहकार्याने काम करावे. अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढण्याकरीता मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९ :-** श्री.संदिप कृ.पोकळे, मालु नगर गोपाल नगर अमरावती. १ गुलमोहर वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल - विद्युत तारेकडे झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही, विद्युत मंडळाने सहकार्याने घेवून व वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची काळजी घेऊन फांद्या काढण्यात याव्यात. अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढण्याकरीता मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ९ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १०** :- श्री.अरविंद दलाल, वैभव कॉलनी अमरावती. स्थानिक प्रजातीचे १ वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल - वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला मनपाने लावलेला आहे. विद्युत तारेकडे झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या विद्युत मंडळाचे सहकार्य घेवुन काढण्यास हरकत नाही, वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची काळजी घ्यावी. अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढण्याकरीता मंजुरीस सादर.

**ठराव क्र. १०** :- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११** :- कोंडेश्वर नाका येथील सर्व्हे क्र.११० मौजा बडनेरा मधील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्प अमरावती. ५४ विविध वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.०३.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, तांत्रिक सदस्यांचा अहवाल- शहर अभियंता यांनी संबंधित स्थळावर किती व कोणत्या प्रजातीचे वृक्ष आहेत याबाबतची यादी जोडावी त्यापैकी किती वृक्ष काढावयाची आहे(कोणत्या प्रजातीची व क्रमांकाची) तसे नमुद करावे तसेच नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे प्रपत्र सी कलम ८(२) नुसार प्रस्ताव द्यावा व त्यानंतर संयुक्त पाहणीसाठी ठेवावे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाशी संबंधित असल्याने तातडीने कार्यवाही करावी तो पर्यंत वृक्ष काढण्याची परवानगी स्थगित ठेवण्यात यावी.

**ठराव क्र. ११** :- सदर काम आवश्यक असल्याने सन्मा.सदस्य व तांत्रिक सदस्य यांचे सह सहा.आयुक्त यांनी सामुहीक पाहणी करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२** :- गैरअर्जदार श्री.डॉ.इरशाद मुश्ताक अहमद जुनीवस्ती बडनेरा. १ कडूनिंब वृक्षाच्या फांद्या अवैधरीत्या काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** गैरअर्जदार वैधरित्या कडूनिंब वृक्षाच्या फांद्या तोडण्याबाबत दि.०८.०४.२०२० रोजी जावक क्र. अमनपा/द.प्र./सआ/१५/२०२० रोजी स्पिडपोस्टव्दारे नोटिस बजावण्यात आली. आपल्या माहिती व कार्यवाही करीता सादर.

**ठराव क्र. १२** :- नोटीच चे उत्तर प्राप्त न झाल्यास दंडाची कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १३** :- श्री.बाळु ठवकर(लिलाधर काशिनाथ ठवकर), कंपासपुरा जुनीवस्ती, ३४ विविध प्रजातीचे वृक्ष अवैधरीत्या काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर तक्रार अर्जावर गैरअर्जदार श्री.रवि देवराव अंबाडकर यांना अवैधरित्या शेतातील ३४ वृक्ष तोडण्याबाबत दंडात्मक कार्यवाही म्हणून महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम नुसार रुपये ५२२९२०/- दंडाची नोटीस बजावण्यात आलेली आहे. आपले माहिती करीता सादर.

**ठराव क्र. १३** :- सदर प्रकरणात प्राप्त झालेले उत्तर वृक्ष प्राधिकरणा समोर अहवालासह ठेवण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १४** :- श्री.विरेंद्र लढ्ढा अध्यक्ष औद्योगिक वसाहत सहकारी संस्था सातुर्णा, जांभुळ, सिसम, स्थानिक प्रजातीचे असे एकुण ४ वृक्षाच्या फांद्या अवैधरीत्या काढल्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** गैरअर्जदार श्री.गोपालदासजी मुंधडा यांना अवैधरित्या ४ वृक्षाच्या फांद्या तोडण्याबाबत दि.२६.०५.२०२० रोजी जावक क्र. अमनपा/द.प्र./सआ/१५३/२०२० रोजी स्पिडपोस्टव्दारे नोटिस बजावण्यात आली. आपल्या माहिती व कार्यवाही करीता सादर.

**ठराव क्र. १४** :- नोटीसचे उत्तर प्राप्त न झाल्या दंडाची कार्यवाही करावी.



Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १५ :-** श्री.त्रिलोक जसवानी, सिंधी कॅम्प नवीवस्ती, बडनेरा, १ वड वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१०.०५.२०२० रोजी झालेल्या वादळी वाऱ्याच्या कारणामुळे वडाचे वृक्ष हे तक्रार कर्त्यांच्या घरावर तुटुन पडल्याने सदर वृक्षाची विल्हेवाट उद्यान विभागामार्फत लावलेली आहे. कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. १५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १६ :-** डॉ.श्री.राजेंद्र तायडे सन्मा.नगरसेवक वैभव कॉलनी, अमरावती, १ बकान वृक्षाच्या वादळाने पडलेल्या फांद्याची विल्हेवाट लावण्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल- वादहीने बकान वृक्ष(आकाश निंब) मोठ्या फांद्या कोसळल्या त्याची विल्हेवाट लावण्यास तसेच उर्वरित वृक्षाचा भाग हा हिरवागार व सुस्थितीत आहे, वृक्ष रस्त्याच्या सार्वजनिक जागेवर सुरक्षित आहे. सबब वृक्ष तोडण्याची गरज नाही. तथापि वरील वृक्षाच्या पडलेल्या अवशेषाची विल्हेवाट उद्यान विभागामार्फत लावण्यात आलेली आहे. आपल्या माहितीस सादर.

**ठराव क्र. १६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १७ :-** श्री.राजा गुप्ता, गांधी मार्केट नवीवस्ती बडनेरा, अमरावती, वादळाने पडलेल्या १ महारुख वृक्षाची विल्हेवाट लावण्याबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१०.०६.२०२० रोजी झालेल्या वादळी वाऱ्याच्या कारणामुळे श्री जयस्वाल यांच्या खाजगी जागेतील महारुख वृक्ष हे तक्रार कर्त्यांच्या घरावर तुटुन पडल्याने सदर वृक्षाची विल्हेवाट मनपा कंत्राटदार यांच्याव्दारे करण्यात आली. कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. १७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. व कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १८ :-** श्री.चंद्रशेखर रघुवंशी, प्रसाद कॉलनी, अंबिका नगर अमरावती, १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२९.०६.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, तांत्रिक सदस्यांचा अहवाल- अर्जदाराकडे त्यांचे स्वतःचे आवारात कडूनिंब वृक्ष आहे. वृक्ष छान वाढलेले आहे व आता अर्धा हिरवा व अर्धा वाळलेला आहे. वृक्षाची साल काढुन वृक्ष वाळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते परंतु अर्धा वृक्ष वाळल्यामुळे वृक्ष काढण्याची परवानगी देणे गरजेचे आहे. सबब तीन बदली वृक्ष लावण्याची ठेव नियमानुसार घेवून परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र. १८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १९ :-** श्री.प्रमोद गोविंदराव तिडके, अभियंता कॉलनी, अमरावती, २ पाम वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२९.०६.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, तांत्रिक सदस्यांचा अहवाल- २ पाम वृक्ष अर्जदाराच्या घराजवळ रस्त्याचे कडेला सार्वजनिक जागेवर छान वाढलेले व हिरवेगार आहे. वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदाराने वृक्षाला दिलेला रंग इकोफ्रेन्डली नसल्याने तो रंग काढुन टाकण्याच्या सुचना दिल्या वृक्षावर पक्षांची घरटी असून अर्जदाराने वृक्षाला इजा पोहचवू नये असे फरमाविण्यात यावे. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. १९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २० :-** श्री.सुधिर मनोहरराव मडगे, न्यु गणेश नगर, सरोज कॉलनी, अमरावती, १ कडूनिंब वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल- विजेच्या तारेकडे झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवनगी देण्यास हरकत नाही. विद्युत मंडळाच्या सहकार्याने फांद्या काढाव्यात. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगीकरीता सादर

**ठराव क्र. २० :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. मराविवि कंपणीला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २१ :-** श्री.पुंजारामजी झोलबाजी ठवरे, गौतमबुध्द वार्ड पाच बंगला बडनेरा, १ महारुख वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल- महारुख वृक्षाच्या घरावर झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगीकरीता सादर

**ठराव क्र. २१ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २२ :-** श्री.केतन शांतीलाल रायचुरा, शारदा विहार अमरावती, स्थानिक प्रजातीच्या २ वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल- उद्यानातील वृक्ष आहेत, उद्यान विभागाने उपरोक्त २ वृक्षांच्या विद्युत डि.पी.वर झुकलेल्या तारेवर लागलेल्या फांद्या काढण्याची कार्यवाही करावी. विद्युत मंडळाचे सहकार्य घ्यावे. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगीकरीता सादर

**ठराव क्र. २२ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. मराविवि कंपणीला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २३ :-** श्रीमती प्रभावती साहेबराव हिंगनकर, खंडेलवाल मार्केटमागे अकोली रोड साई नगर, अमरावती, १ गुलमोहर वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल- उद्यानातील वृक्ष आहेत, उद्यान विभागाने उपरोक्त २ वृक्षांच्या विद्युत डि.पी.वर झुकलेल्या तारेवर लागलेल्या फांद्या काढण्याची कार्यवाही करावी. विद्युत मंडळाचे सहकार्य घ्यावे. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगीकरीता सादर

**ठराव क्र. २३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. मराविवि कंपणीला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २४ :-** श्री.बंडु अजाबराव मोरे, जुनीवस्ती बडनेरा, १ पिंपळ वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्यांचा अहवाल- पिंपह वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना विद्युत मंडळाचे सहकार्य घ्यावे. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची काळजी घ्यावी. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगीकरीता सादर

**ठराव क्र. २४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. मराविवि कंपणीला पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned with CamScanner

**पश्चिम झोन क्र. ५**

**अर्ज क्र. १ :-** प्रा.श्री.अजय महल्ले, डोळेचे वाडा बुधवारा, अमरावती. १ औदुंबर वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता औदुंबर झाड अंदाजे ४० ते ५० वृक्ष जुने आहे. झाड मोठ्या प्रमाणात वाकले असून कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणामुळे अर्जदाराने झाडाच्या फांद्या तोडण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यास हरकत नसावी.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** स्वा.निरीक्षक श्री.जिवन राठोड प्रभाग क्र.१६ मनपा, अमरावती. १ सुईबाभुळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर ठिकाणी झाडाची पाहणी केली असता सुईबाभुळ झाड हे सध्या स्थितीत वाळलेले आहे. परवानगी देण्यास हरकत नसावी.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.प्रशांत बोदळे, रविनगर, अमरावती. १ अशोका वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदाराने झाड तोडण्याची परवानगी मागीतलेली आहे. परंतु तांत्रिक सदस्य यांची पाहणी झाल नसल्याने अहवाल प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केल्या नंतर सादर केल्या जाईल.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** मा.नगरसेविका, नजमुन्नीसा सैय्यद महेमुद प्रभाग क्र.४, अमरावती. ४ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य यांची पाहणी झाली नसल्याने अहवाल प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केल्या नंतर सादर केल्या जाईल.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** मा.नगरसेविका, हाफिजा बी. युसुफ शाह, प्रभाग क्र.१५, अमरावती. ३ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** तांत्रिक सदस्य यांची पाहणी झाली नसल्याने अहवाल प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केल्या नंतर सादर केल्या जाईल.

**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.४ :-** शहरातील वृक्षाचे संरक्षण व अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी रॅपिड ॲक्शन फोर्सचे गठण करण्याबाबत.(वनराई यांचे मार्फत सुचविलेल्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे)

**ठराव :-** सामाजीक संस्थांबाबत धोरण ठरवून सादर करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ५ :- **मा.सभापती, यांच्या मंजुरीने वेळेवर येणारे विषय.**

**विषय क्र. १ :-** केंन्द्र सरकारच्या नगर वन योजनेत अमरावतीचा सहभाग बाबत



Scanned with CamScanner

**<u>ठराव क्र. १</u> :-** केंद्र सरकारने देशातील २०० शहरात नगर वन निर्माण करण्याचे ठरविले असून त्यात अमरावती शहराचे नाव आहे. शहराच्या अंतर्गत येणाऱ्या ३० हेक्टर पर्यंत जागेवर नगर वन निर्माण करावयाचे असून जागेचा शोध घेण्यात यावा, तसेच वनविभागाशी संपर्क करुन नगर वन निर्माणीत मनपाने पुढाकार घ्यावा अशी माहिती वनराईचे अध्यक्ष व वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य मधुभाऊ घारड यांनी यावेळी दिली त्यास सर्वांनी संमती दर्शविली आहे. पुढील कार्यवाही व संपर्क वृक्ष प्राधिकरण व मनपाचे वतीने उद्यान विभागाने करावी. व शहर अभियंता मनपाचे समन्वयक म्हणून राहतील असे ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>झोन क्र. २</u> :-**

**<u>अर्ज क्र. १</u> :-** श्री.संजय मामर्डे, स्टेट बँक कॉलनी, अमरावती. कडूलिंब वृक्षाच्या २ फांद्या तोडणेबाबत.

**<u>ठराव क्र. १</u> :-** ३ ते ४ इंच डायमिटर च्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**<u>झोन क्र. ४</u> :-**

**<u>अर्ज क्र. १</u> :-** रॉय उद्योग लिमीटेड / नवल कुमार देवकरण जी भूत, झाडे लावण्यासाठी जागेची परवानगी मिळणेबाबत

**<u>ठराव क्र. १</u> :-** सन्माननिय नगरसेवक व तांत्रिक सदस्य व स्वतः मालकासह जागेची पाहणी करण्यात यावी. व प्रथम त्यांचे जागेत बसणारी वृक्ष लावण्याचे सुचविण्यात यावे व उर्वरित वृक्षांसाठी मोठी जागा उपलब्ध असल्यास मा.सभापतींच्या परवानगीने संबंधितांना जागा उपलब्ध करुन द्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

सन्माननिय सदस्य यांनी ट्रिगार्ड बाबत मागणी केली असता, सदर विषयाचे संदर्भात उद्यान विभागाकडे जमा असलेल्या जुन्या ट्रीगार्ड मधून पदाधिकाऱ्यांना तुर्त १० व वृक्ष प्राधिकरण सदस्यांना १० व इतर सदस्यांना ५ याप्रमाणे ट्रीगार्ड द्यावे. व काही जुने ट्रिगार्ड काढण्याची कार्यवाही करावी. तसेच नविन ट्रिगार्ड ची निविदेची प्रक्रिया तातडीने पुर्ण करावी. असे निर्देश मा.सभापती तथा आयुक्त, महोदय यांनी दिले.

यानंतर कार्यक्रम पत्रीकेवरील विषय संपुष्टात आल्यामुळे उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**मा.सभापती तथा आयुक्त,**
**महानगरपालिका, अमरावती**



Scanned with CamScanner